ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | मालती - कविता संग्रह |
| कवि | : | बाळकृष्ण मार्तंड दाभाडे |
| प्रकाशक | : | अनंत यशवंत देशपांडे, सातारा |
| प्रकाशन वर्ष | : | १९३३ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२२

साहित्य-सरोज-मण्डळाचें तिसरें पुस्तक

# मा ल ती

[ कविता-सङ्ग्रह ]

शशाङ्क

[ बाळकृष्ण मार्तण्ड दाभाडे, औन्ध ]



पौष १८९९ ] [ किं. १० आणे

## साहित्य-सरोज-मण्डळ, औंध

अनन्त यशवन्त देशपाण्डे

श्रीधर गणेश दाढे

दत्त गोविन्द बोपर्डीकर

बाळकृष्ण मार्तंण्ड दाभाडे

प्रकाशक
अ. य. देशपाण्डे,
वाङ्मय-विशारद,
औंध [ जिल्हा सातारा ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस,
५७० शनवार, पुणें, २.

हक्क कर्त्याकडे


शशाङ्क
M. Satwalekar
13-8-33

# कटाक्ष

"मालती"चा चेहेरामोहरा खरोखरच 'मनोहर' आहे, असें तिच्याकडे अगदीं ओझरत्या नजरेनें पहाणाऱ्या रसिकाच्या देखील ध्यानांत येईल. सुंदर व ठळक छपाईचा साज-शिणगार अंगाखांद्यावर घातल्यानें ती अधिक ठसठशीत दिसते ही गोष्ट खरी. तथापि, तिच्या अंगकांतीची नव्हाळी कांहीं कमी मोहक नाहीं. तिची अंगलट रेंखीव, सडपातळ व आटोपशीर आहे. तिची रसवंती फार मंजुळ व मिठास आहे आणि तिच्या चरणचालींत गज-गामिनीच्या मादक मंदतेपेक्षां आधुनिक तरुणीच्या पदक्षेपाचा विलासी तल्लखपणाच अधिक आढळून येतो.

मात्र 'मालती'चा तोंडवळा व रंग आधुनिक मराठी कवितेच्या वाचकांना थोडा ओळखीचा वाटेल. तिच्यांतील 'पांडव-दिडकी', 'भिल्लीण-दिडकी', 'बालानंद', हीं वृत्तें वाचून 'तीव्र दुक्खें गान्जते', किंवा 'नाचरङ्गीं रङ्गला' ही लेखनपद्धत पाहून व "दुष्काळ पडोनि बनला भारत सारा। वैराण सहारा" अथवा "हे कोण म्हणे दे. भ. नि ते मौलवी भाई। मारीत बढाई" अशी तऱ्हेवाईक रचना वाचून ही औंधच्या 'सरोज-मंडळां'तील 'मालती' पुण्याच्या 'रविकिरण-मंडळां'तील 'माधवा'वर पुष्कळच अनुरक्त असावी असें कोणाही जाणत्या रसिकाच्या ध्यानांत येईल. तथापि समाधानाची गोष्ट एवढीच कीं, 'मालती'च्या प्रेमांधतेची मजल 'माधवा'च्या उर्दू वेडाच्या अनुकरणापर्यंत गेली नाहीं. ती गीर्वाण संस्कृतीची कट्टी अभिमानी आहे. ही गोष्ट पुरुषांपेक्षां स्त्रियाच संस्कृतीचें व परंपरेचें अधिक संरक्षण करतात या समजुतीला पोषकच आहे. 'माधवा'शिवाय करून 'गोविंदाग्रज', 'बाल-कवि' व 'गिरीश' यांच्याशीं 'मालती'चे संबंध अधिक सलगीचे असावेत असें अनुमान करावयास पुष्कळच जागा आहे. अनुकरणाची ही एवढी लकब वजा केली तर 'मालती'च्या एकंदर चालचलणुकींत खोड काढण्यासारखें फारसें कांहीं सांपडणार नाहीं.

'मालतीं'त अंतर्भूत झालेल्या एकंदर ४० कवितांमध्यें एकतृतीयांश कविता देशभक्तिपर व सद्यःस्थितिदर्शक आहेत.

भरतभूमि आज कशी हीन दीन झाली।
पूर्वविभव लोपुनि ये परवशता भालीं॥

अशी तीव्र टोंचणी कवीच्या काळजांत एकसारखी सलत आहे. तथापि, कवीची ही निराशावृत्ति फार काळ टिकत नाहीं.

गांधी--जवाहर मोहरे कारागृहांतरीं खेचले ।
अपराधही लव ज्या न त्या सत्रामधें चिरडीयलें ।।

हें दृश्य बघून त्यांना त्वेष चढतो. त्यांना भारताच्या उज्ज्वल इतिहासाची आठवण होते.

मर्द शूराची भरारी आज कोठें गुंगली
दास्यपंकीं लोपली !
वीर जाज्वल्याभिमानी श्रीशिवाजी आपुला,
स्त्रैण तुम्ही जाहलां !

अशा इरेसरीच्या आवेशानें ते चवताळतात. इतक्यांत स्वराज्याचा गंभीर डंका वाजलेला त्यांच्या कर्णपथावर येतो:

दुमदुमे नभीं हा स्वराज्य डंका पहा ।
आकाशीं नाद भरोनी । व्यापिला हिंद देश हा !

आणि मग सर्वस्वाची आहुति टाकण्यास ते सिद्ध होतात.

जीवाची सोड आस सत्याची धरुनि कास
टाक उडी सागरांत ईश तुझा वाली ।।

हे त्यांचे उद्गार गेल्या स्वराज्याच्या चळवळींत कित्येक तरुणांनीं आपल्या कृतीनीं खरे करून दाखविले आहेत ! या विषयावरच्या कवीच्या कविता वाचून खरोखरच आवेश चढतो व स्फुरण येतें. कवीच्या कवित्वाचा हा एक उज्ज्वल पैलु आहे असेंच मला वाटतें. सामाजिक अन्यायाच्या बाबतीं-तही कवि तितकाच जागरूक आहे. स्वतःचीं तत्वें गुंडाळून ठेवून व केवळ वरिष्ठांना प्रसन्न करून स्वतःची उपजीविका करणें असल्या आयुष्यव्ययाचा त्यांना अत्यंत तिटकारा आहे (पान ३०). जातिभेद त्यांना मान्य नाहीं.

जातिभेदाचें पुराणें वस्त्र देई फेकुनी
उच्च मी अन् नीच तो ही भावना दे टाकुनी (पान ४२)

असें ते ठासून सांगतात. राजपुरुषाच्या समाधानार्थ न्यायाचा विक्रा करून दीन-दुबळयांच्या आयुष्याची होळी करणाऱ्या न्यायाधिशांना ते 'स्वार्थी मानव राक्षस' असें संबोधतात. एकंदरींत असत्य, अन्याय व गुलामगिरी या

गोष्टींचा कवीला अतिशय तिटकारा आहे; ही गोष्ट हा काव्य-संग्रह वाचतांना प्रमुखपणें ध्यानांत येते. सृष्टिवर्णनात्मक कविता लिहिण्याचे कामीं दिसून येणारें कवीचें कौशल्य प्रशंसनीय आहे "तो आणि ती" (पान १८), "समाधीपुढें" (पान ३१), "शुक्राची चांदणी" (पान ३९) या कविता फारच हृदयंगम आहेत. या कवितांतच नव्हे तर इतर कवितांतून दिसून येणारी कवीची मार्मिक अवलोकनशक्ति, विपुल व वेंचक शब्दसंग्रह आणि सौंदर्यदृष्टि जागृत ठेवून केलेली ठसकेबाज रचना हे गुण प्रामुख्यानें वाचकांच्या मनावर विशेष ठसतात.

"मोहिनी" (पान २१), "सागरीं लोटिली नाव कुणीं?" (पान २३), "कां आत्मवंचना तूं करिशी" (पान ३३), व "वंचिता" (पान ५८) या कवितांत उपरोक्त गुणांचा उत्कर्ष झालेला दिसेल. जुन्या वाङ्मयांतील नखरेबाज शब्द निवडून काढण्याकडे कवीचें विशेष लक्ष्य आहे. नबाजीक सौंदर्य, माना वेळुनि पहाणें, बंधनें आंसडोनी तोडणें, मुऱ्हें, कोल्हिसवाणें, पायाचे पळके हे शब्दप्रयोग नमूद करण्यासारखे आहेत तथापि, 'ग्रांथिक काव्य' व 'लेखाळ' हे दोन नवीन शब्द कवीनें जे बनविले आहेत ते फारसे चांगले नाहींत. ग्रांथिक काव्यावरून ग्रांथिक सन्निपाताची आठवण होते. संस्कृत शब्द वापरण्याकडे कवीचा अधिक ओढा असला तरी मराठमोळ्याची भाषेची आवड कवीला अधिक दिसते. सर्व कविता अगदीं घासून पुसून अगदीं चक्क करून मांडून ठेवल्यासारख्या दिसतात. नाविन्याची नव्हाळी व तजेला चहूंकडे चकमकतांना दिसतो.

उद्योगाचा नांगर धरुनी तण काढी उपटुनी
साहस-वृषभातें जोडुनी ! (पान २०)

असली चापेकरी काव्यरचना क्वचित् दृष्टीस पडते. तथापि, ही कवितादेखील 'किर्लोस्कर' मासिकासाठीं मुद्दाम लिहिली असल्यामुळें कवीचा अगदींच नाइलाज झाल्यासारखा दिसतो. कवीच्या शृंगारिक कविताही बऱ्यापैकीं आहेत. तथापि त्यामध्यें भावनांचा खळबळाट नाहीं. "वैफल्य" या कवितेंत एका चारुगात्री तरुण बालिकेच्या अंतःकरणांत 'वैवाहिक भावना' येत नाहीं म्हणून कवींना वाईट वाटल्यासारखें दिसतें व अखेर—

"कौमार्य गे पावेल कां संपूर्णता लग्नाविना ?"

असा प्रश्न ते विषण्णपणें विचारतात. लग्नामुळें खऱ्या सौंदर्याचा विकास होतो हें या कवीचें मत अविवाहित कुमारिकांना आजच्या काळांत फारसें पसंत पडणार नाहीं.

हे अल्प स्वल्प दोष वजा केले तर आरंभीं सांगितल्याप्रमाणें 'मालती' ही खरोखरच मनमोहक आहे यांत शंका नाहीं. आजपर्यंत सदर कवींनीं आपला काव्य-संग्रह प्रसिद्ध केला नाहीं त्याचें कारण त्यांचा लाजरा व टीकाभीरु स्वभाव !

मानसीं नवोनव उद्भवती कल्पना
परि कुणापुढें मांडाया ना धीर होतसे मना

शारदेच्या मंदिरांत प्रवेश करण्याची त्यांना बलवत्तर इच्छा होती; पण त्या मंदिराभोंवतीं कोंडी करून बसलेल्या टीकाकारांच्या पोलिसी जुलुमाला ते भीत असत.

तुझ्या मंदिराभंवतिं पहारा मार्ग न मज येण्यास
द्वारपाल तव येऊं न देती ताडिति मज दीनास !

खऱ्याखुऱ्या पोलिसाप्रमाणें वाङ्मयांतल्या पोलिसांच्या हातून देखील पुष्कळ वेळां अन्याय होतो. निर्बुद्ध व उडाणटप्पू लोक सहिसलामत शारदेच्या मंदिरांत पुढल्या रांगेंत येऊन बसतात व सात्त्विक स्वभावाच्या गुणवंतांच्या टाळक्यावर दंडुकीं बसतात ! 'मालती'च्या कर्त्याला या अन्यायाचा थोडासा प्रसाद चाखावा लागला असल्यास नवल नाहीं ! तथापि यापुढें तरी त्यांच्या बाबतींत असा अन्याय होणार नाहीं हें या काव्यसंग्रहाच्या वाचनानें रसिक वाचकांना पटल्याखेरीज रहाणार नाहीं ! शारदेच्या मंदिरांत यापुढें त्यांनीं निर्धास्तपणें यावें आणि आपल्या प्रतिभेच्या चित्तवेधक विलासांनीं त्यांनीं रसिकांना संतोष द्यावा अशीच त्यांच्यापासून कोणीही रसिक अपेक्षा करील ! बासष्ट पानांचा हा छोटा, निवडक व सुंदर काव्य-संग्रह बघून बेन जॉन्सनची पुढील ओळ कोणाला आठवणार नाहीं ?

In small proportions we just beauties see;

पुणें,
ता. ३०।११।३३.

प्रल्हाद केशव अत्रे

# परिचय

पावसाळयांतील कोसळत्या सरींनीं रोज ओलेचिम्ब होणारे पंख पावसाळा आणि हिंवाळा यांच्या दरम्यानच्या कालांत सुकवितांना चिमण्या-पांखरांना अननुभूत आनन्द होतो. शारदीय ज्योत्स्नेंतून तरळतांना या नाजुक जीवांना अस्मान ठेंगणें होतें. हेमन्तांतील बर्फाळ शीतलतेची आज ते चिन्ता करीत नाहींत. पुढें काय होईल या प्रश्नाचा ज्योतिष्याच्या गांभीर्यानें निकाल करण्याचें त्यांना कारण नसतें. काव्य-प्रदेशांतील नवत्या जीवांना देखील असला सन्धिकाल मोठा मनोरम भासतो, म्हणूनच आपल्या प्रतिभेचे कोवळे पङ्ख सुकवितांना त्यांचें कौतुक व्हावेंसें त्यांना वाटतें. आज लिहिलेलें काव्य रसिकाच्या ऐरण-घणांतून तावून सुलाखून निघालें तर गुणदोषांची जाणीव ठवून उसळत्या उत्साहानें पुढील सेवा करण्यास ते उद्युक्त होतात.

श्री० बाळकृष्ण मार्तण्ड दाभाडे हे 'शशाङ्क' या नांवानें महाराष्ट्र वाचकांस परिचित आहेत. सन १९२८ पासून आजतागायतचा त्यांचा त्रुटित काव्य-संग्रह त्यांनीं एकत्र केला आहे. बहुतेक सर्व कविता अधून मधून गेल्या दोन तीन वर्षांत बऱ्याच मासिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत. प्रस्तुत सङ्ग्रहांतील त्यांच्या काव्याचे ठोकळ मानानें प्रेमपर, सृष्टिवर्णनात्मक, राष्ट्रीय व आत्मपर असे चार मुख्य भाग पडतील. त्यांची प्रेमगीतांची मालिका सहानुभवाच्या हळुवार रङ्गांनीं नटलेली आहे तर सृष्टिवर्णनात्मक गीतांत सूक्ष्मावलोकन व्यक्त होतें. राष्ट्रीय पद्यें वीरोचित भडक रङ्गांत उठलेलीं दिसतील. आत्मपर काव्यें म्हणजे जगाच्या अन्यायानें काळवंडलेले सूर कांहीं ठिकाणीं उदास, कोमल तर इतर ठिकाणीं तीव्र अनुभवजन्य जुगुप्सेनें विटलेले आढळतील. तथापि एकन्दरींत त्यांचा ओढा राष्ट्रीय कवनाकडे अधिक आहे हें वाचकांना सहज उमगेल. त्यांच्या काव्याविषयींची अशा तऱ्हेची एक पुसट बाह्यरेषा दाखवून, तिचें अन्तरंग चांचपण्यापूर्वीं, या उठाव रेखाटनास योग्य अशी पार्श्वभूमि कोणती आणि ती कशी निर्माण झाली हें पाहाणें अगत्याचें आहे.

कवीचें आजवरचें बहुतेक आयुष्य औन्धच्या कलासंपन्न पण आडवळणी वातावरणांत गेलें. प्रत्यक्ष नसली तरी अप्रत्यक्ष कां होईना; त्यांच्या स्फूर्तीस त्यांच्या पित्याची चतुरस्रताच कारण झाली असें मला वाटतें. श्री० बाळकृष्णबुवांचा गायनाचा व्यासङ्ग दीर्घ असून, मन्त्रमुग्ध गोड लकेरीवर बेहद्द खूष झालेले रसिक औन्धच्या राजवटींतच काय पण इतरत्रही कितीतरी सापडतील. त्यांचा साहित्याचा, ललितकला आणि चित्रकलाशास्त्राचा अभ्यास स्पृहणीय आहे. त्यांच्या उज्ज्वल भविष्याबद्दल त्यांच्या स्नेह्यांना व चहात्यांना नेहमीं विश्वासपूर्ण अभिमानच वाटतो. त्यांच्या गायनांतून पाझरणारी त्यांची बेफिकीर गोड स्वतंत्र वृत्ति त्यांच्या काव्यांतून उत्कृष्ट उमटते व जगांत वावरतांनाही ते असेच वागतात.

शूद्रवृत्ति आचरितां होउनी तेजोवध ?
लोपले पौरुष्य ? निद्रा त्यागुनि व्हा सावध

असें खडखडीत आवाहन करतांनाही

'जाहली निष्प्राण माता पारतन्त्रें विद्धिली'

असे करुणोद्गारही ते काढतात. त्यांच्या स्वतन्त्र वृत्तीचें तेजस्वी उदाहरण ते जेव्हां १९३०च्या कायदेभङ्गाच्या चळवळींत खालसांतील नोकरी सोडून घरीं आले तेव्हांचें दाखवितां येईल. त्यांच्या आसपासच्या त्या सडलेल्या प्रभावळीचें रसपूर्ण वर्णन करतांना अजूनही त्यांना त्वेष येतो; आणि

कान्चना विलोभुनि दास्यापाशीं गुन्तलों

असें म्हणून स्वतःची निर्भत्सना करून हाच गुलामगिरीचा माणुसकी विसरविणारा अनुभव "प्रवासी गुलाम" या कवितेंत उत्कृष्ट वर्णन करतात. कौटुम्बिक परिस्थितीमुळें आणि इतर अडचणींमुळें स्वतःला राष्ट्रकार्यांत प्रत्यक्ष भाग घेतां येत नाहीं याबद्दल स्वतःलाच नादानपणाचा शिक्का मारायलाही ते कचरत नाहींत. सभोंवतालच्या स्वाभिमानशून्य व हांजीखोरांची कानउघाडणी करतांना ते जरा तिखट घाव घालतांना दिसले तरी त्यांतूनही त्यांची अन्तरींची तळमळ आणि सुतरां गोडवेपणाच अधिक व्यक्त होतो. या सर्व गुणसमुच्चयाबरोबर रसाळ व परिणामकारक कीर्तनकार असें अल्पावधींतच त्यांनीं नांव केलेलें आहे. बाळकृष्णबुवांची पल्लेदार बुद्धि

इतक्या प्रान्तांत सुखेनैव कौतुकास्पद संचार करूं शकते. ज्या भूमिकेवर अधिष्ठित होऊन कवि आपली कुशल कुंचली घेऊन 'नव नवोन्मेषिणी रम्य अशा कल्पना' चित्रित करतो, तिची पार्श्वभूमि इतकी उठावदार आणि अनुकूल अशी आहे. मित्रविषयक अन्धप्रेमामुळें वाचकांना कवीच्या गुणांचा फाजील आविष्कार होतोसा वाटला तरीही वस्तुस्थिति आहे खरी अशी, ही ग्वाही दिल्यावांचून रहावत नाहीं.

जातां जातां कवीच्या काव्यात्मक गुणदोषांचा–शक्यतों गुणांचाच ओझरता उल्लेख करणें–आणि तोही वाचकांस मार्गदर्शक होईल अशा बेतानें–हें योग्यच ठरेल. कालानुक्रमानें पाहिल्यास कवीचें पहिलें लिखाण ललितोन्मत्त प्रेमांत उदय पावतें तर लगेच पुढें कवि भावनेच्या आर्द्रतेनें त्यांत समरस होत असला तरी तिऱ्हाईतपणाचा वेष टाकीत नाहीं, हें स्पष्ट दिसतें. यानंतर कवीची दृष्टि राष्ट्रीय विषयाकडे वळते. या स्थलीं मात्र बराच काल कवीचें आसन स्थिरावल्यासारखें दिसतें. अलीकडच्या काव्यांतून शेवटीं शेवटीं तर कवीची दृष्टि अन्तर्मुख वा आत्मप्रवण होते. या ठिकाणीं बाहेरच्या सुष्ट-दुष्ट जगाचें प्रतिबिंब त्याच्या अन्तःफलकावर उत्कटतेनें उमटून त्याचा आत्मविश्वास द्विगुणित होतो. याच दृष्टीनें मला त्यांची "सभोंवार" ही कविता बरीच आवडते व पटतेही. असल्या काव्यांतील स्वभावोक्ति सर्वांच्या अनुभवाची आहे. प्रस्तुत संग्रहांत वृत्तांचें असलें तरी विषयांचें वैविध्य बेताचेंच आढळतें. कवीची प्रतिभा पृथगात्म म्हणून निर्देशितां आली नाहीं आणि तिचा संचार थोडा आखडता दिसला तरी भावनेची उत्कट खळबळ, स्फूर्तीचे जिवंत तेजःकण व सहृदयता आणि या सर्वांस साहाय्यभूत अशी ओघवती अभ्यस्त भाषा यांची मनोज्ञ सांगड सहज प्रचीतीस येईल. त्यांची प्रतिभा 'प्रेमाश्रूंची मौक्तिक माला घेऊन' 'आशा निराशे'ची साधीसुधी पण गोड घडण घडवील; तर दुसऱ्या क्षणीं 'मुग्ध मुलींनो खेळ खेळतां खेळाया घ्या मला' असे कळचांना भ्रमराच्या धिटाईनें विचारील. ती चिन्ताग्रस्त तरुणांस, 'कसली चिंता तुज लागली?' असें हळुवार विचारून त्याला मातृभूमीची सेवा करण्यास उद्युक्त करील, व 'रोकडा सवाल' टाकून मरणाची बेदरकारी पटवील. अशा एक ना दोन अनेक सुंदर कविता वाचकांना यांत

आढळतील. तेव्हां वाचकांनीं अगर खुद्द कवीनेंच 'मित्रैतस्माद्विरम विरमातः- परं न क्षमोऽस्मि ।' असें म्हणण्यापूर्वींच मी आपला हात आखडता घेतों.

माझ्या परिचयाच्या नीरांजनाची अन्धुक वात काव्याच्या सारज्ञतेस किंचित उपयुक्त होईल हें वाचक ठरवितीलच. उद्यांच्या उगवत्या कवि-भास्करांची पाठशिवणी करण्याची तरी 'शशाङ्कां'ची तयारी आहे हें खास. शारदेच्या मंदिरांत प्रवेश करण्यास स्वतःला अस्पृश्य समजण्याचें त्यांना बिलकूल कारण नाहीं. वाढत्या व्यासंगाला काय अशक्य आहे?

शेवटीं सुप्रसिद्ध चतुरस्र लेखक श्री० प्र. के. अत्रे, बी. ए., बी. टी., टी. डी., (लंडन) यांनीं कवीचा व त्यांचा परिचय नसतांही कविकृतीवर कृपाकटाक्ष फेंकला याबद्दल कवीतर्फे मी त्यांचे अत्यन्त आभार मानतों.

श्री० अप्पासाहेब गोखले यांनीं आपलेपणानें काम सुबक करून दिलें याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

औन्धचे तरुण चित्रकार कु० माधव सातवळेकर यांनीं कवीची प्रतिमा काढून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

कुण्डल
५।१।३४.

श्रीधर गणेश दाढे

# गीत-क्रम


| गीत | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ प्रार्थना | – | १ |
| २ रोकडा सवाल | – | २ |
| ३ नेहमींचा अनुभव | – | ४ |
| ४ प्रस्थान भेरी | – | ५ |
| ५ द्रौपदीचा धांवा | – | ७ |
| ६ कुमारिकांचा खेळ | – | १० |
| ७ जीवित–साफल्य | – | १३ |
| ८ वैफल्य | – | १४ |
| ९ उत्तिष्ठत जाग्रत | – | १५ |
| १० क्षणभंगुर जीवित | – | १७ |
| ११ तो आणि ती | – | १८ |
| १२ अन्नपूर्णा | – | १९ |
| १३ कसली चिन्ता तुज लागली ? | – | २० |
| १४ मोहिनी | – | २१ |
| १५ सागरीं लोटिली नाव कुणीं ? | – | २३ |
| १६ आशा–निराशा | – | २५ |
| १७ रणशिङ्ग | – | २७ |
| १८ प्रियेस | – | २८ |
| १९ सुप्त भारतास | – | २९ |
| २० समाधीपुढें | – | ३१ |
| २१ कां आत्मवंचना तूं करिसी ? | – | ३३ |
| २२ समोंवार | – | ३६ |
| २३ न्यायाचा बाजार | – | ३७ |
| २४ गुलामांचा बाजार | – | ३८ |

| | | |
|---|---|---|
| २५ शुक्राची चान्दणी | – | ३९ |
| २६ राजा आणि नर्तकी | – | ४१ |
| २७ आवाहन | – | ४२ |
| २८ सङ्गमोत्सुकद्वय | – | ४३ |
| २९ महात्म्यास | – | ४५ |
| ३० कलावती | – | ४७ |
| ३१ प्रवासी-गुलाम | – | ४८ |
| ३२ नादान | – | ४९ |
| ३३ कृत्रिम गुलाब | – | ५१ |
| ३४ पहिली-भेंट | – | ५२ |
| ३५ सद्यःस्थिति | – | ५४ |
| ३६ मागणें | – | ५६ |
| ३७ प्रेममय-जग | – | ५७ |
| ३८ वंचिता | – | ५८ |
| ३९ एक-दृश्य | – | ६० |
| ४० शापभ्रष्ट देवता | – | ६१ |




मातृपितृचरणीं सादर

# समर्पण

मालती

मालती



मालती

मालती

# मा ल ती

## प्रार्थना

[ जाति–मनमोहन ]

हे स्फूर्तिदेवते ! तव तेजाची ज्योत्स्ना दे उधळून्
दास्यपङ्कीं माय रुतली
हिन्दजनता दीन झाली
जाणीव तिजसि दे महन्मङ्गले ! अन्जन नयनिं भरून्
पारतन्त्र्यें जखडलेले
आत्मतेजा पूर्ण मुकले
चैतन्य तयांचें स्फुल्लिङ्गित करि तेज तुझें विखरून्
नष्ट झालें वीर्य कैसें ?
राष्ट्रभक्ती लोपलीसे
नवजीवन देई यशोदेवते ! तेजसुधा पाजून्
विविध जाती भिन्न रीती
श्रेष्ठता प्रस्थापिताती
वल्गना उच्च अन् नीचत्वाच्या टाकी शान्त करून्
सूज्ञ ही स्वार्थान्ध झाले
मर्द अवघे भ्याड बनले
निद्रिस्त बान्धवा कर जागे रणशिङ्ग तुझें फुंकून्
दास्य तें निर्दाळुनीया
संघशक्ती निर्मुनीया
स्वातन्त्र्यलाभ होउ दे, सङ्गरीं जीव मुदें अर्पून्
दुरित हरुनी तिमिर जाया
दैन्य सरुनी सौख्य याया
या परदास्याच्या लोहशृङ्खला टाक झणी तोडून्

औन्ध, १८।४।३० प्रकाशन–केसरी, ३० सप्टेम्बर ३०

## २

## 'रोकडा सवाल'

[ जाति–मुद्रिका ]

" It is not life that matters! It is the courage you bring to it."

—*Hugh Walpole.*

कल्पनातरङ्गावरी चित्र रेखिलें
मधु भावी आयुष्याचें
तव मानस कां रङ्गलें ? १

कल्पनेंत गुङ्गुनि भानहि तुजला नुरें
माण्डणी सुबकशी केली
कां वाऱ्यावर ती विरे ? २

निष्कण्टक पथ हा आयुष्याचा असे
वाटून तुला ना तेव्हां
मन झालें वेडें-पिसें ! ३

खडकाळ मार्ग हा आयुष्याचा परी
सङ्कटादि पर्जन्याच्या
येतात सरीवर सरी. ४

ठेंचाळुनि पडसी उठुनि पुन्हा चालसी
होउनी घाबरा जीव
मुख दावाया लाजसी ! ५

आपदाकुण्ड धडधडें, आग चहुंकडे
जाहली राख आशांची
कां जीव आंतुनी कढे? ६

केलेस नवोनव प्रयत्न रात्रंदिनीं
हें धैर्य तुझें बघतांना
मी स्तिमित होतसें मनीं ७

यशलाभ जाहला मुळीं न तूतें जरी
नैराश्य तुला नच येवो
ही एक आस अन्तरीं ८

झालास अपेशी ? त्यांत काय एवढें !
झुन्जलास ना धैर्यानें
हें शौर्य तुझें केवढें ! ९

जर लढतां लढतां देह ठेविला रणीं
जन गातिल तव पोवाडे
तें सुयशचि समजे मनीं १०

हे मानव मरणाधीन तूंहि त्यांतला
कर्तव्य बजावित मोदें
कवटाळी मृत्यू भला ११

दो हात करी टाकून पुढें पाउल
आदरें शीर्ष नमवोनी
शत्रूहि तुला धानिल १२

भीरूपरि सोडूं नको प्राण बापुडा
मेलास कसा तूं ? ऐसा
हा सवाल तुज रोकडा १३

औंध, १७।४।३०

प्रकाशन-स्फूर्ति, जुलै ३०

## 'नेहमींचा अनुभव'

[ सुनीत-वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

सौन्दर्यें नटली सुरम्य पुतळी तारुण्य गात्रीं खिळें
साण्डे यौवन काय ? तेज वदनीं या पौर्णिमेचें खुलें
वायूच्या झुळकीसवें विखुरती मागें पुढें कुन्तल
भालीं कुङ्कुम लोचन भ्रुकुटिच्या खालीं बहू चञ्चल
नेत्रीं जादुगिरी, कपोल करिती स्पर्धा गुलाबाप्रती
पर्णें ओष्ठ तयांत कुन्दकलिका आंतून डोकावती
ओष्ठीं त्या स्त्रवते सुधा मधुरशी स्वर्गीं तुला ज्या नसे
चार्वङ्गी नवयौवना बघुनिया कोणा जडें ना पिसें ?

† † †

केला विद्ध सुविद्य सुन्दर युवा मार्गीं कटाक्षें क्षणीं
झाला मोहित, भाग्यही उजळलें लाभे तया मोहिनी
वाटे तुच्छ जगत् सुखें क्रमतसे आयुष्य आनन्दुनी
त्याचें पाहुनि भाग्य लोक करिती हेवा मनीं जाणुनी

† † †

तारुण्यांतिल सौख्यद क्षण तसें स्वर्गीय संमोहन
लोपे. नीरसता जगीं उरतसे शैथिल्य गात्रांतुन

औन्ध, २३।७।२९ प्रकाशन—ज्ञानप्रकाश, ४।१०।२९

५

## 'प्रस्थान-भेरी'

[ जाति-गिरिराय, अन्तरा किञ्चित् दीर्घ ]

हा भेरिनाद जगिं दुमदुमला ॥ ध्रु०॥

निशीथकालीं उडुगण गगनीं
नाश पावतो रविकिरणांनीं
तेवि गान्धिजींच्या आगमनीं
परदास्याचा लय झाला १

सत्यरक्षणा जगिं अवतरले
पाश्चिमात्यही बहु खळबळले
थरारून जग अवघें गेलें
भाग्यभानु उदया आला २

श्येन झडपितो लावक पक्षी
दिव्य महात्मा तैसा लक्षी
दास्य विन्धुनी, स्वदेश रक्षी
कीर्तिध्वज जगिं फडकविला ३

भेरीची गम्भीर गर्जना
ऐकुनि वाटे लाज नभि घना
सिंहनादही तुल्य ठरेना
जागृत भारत हा झाला ४

गिरी-गव्हरीं नाद उमटला
गगनकटाहा भेदुनि गेला
शूर असुनि कां स्वस्थ बैसला ?
ऊठ ऊठ या समयाला १

समरयज्ञ हा बघ धडधडला
उचित मरण हें तुज शूराला
धांव लवकरी उशिर जाहला
स्वतन्त्रता मिळवायाला २

औन्ध, १७।५।३० प्रकाशन–स्फूर्ति, सप्टेम्बर ३०



७

## 'द्रौपदीचा धांवा'

[ छन्द-ओवी ]

दुःशासनें अलकभार, खेंचोनि पाडिली भूवर
कृष्णा, दुर्योधनासमोर, राजसभागृहान्तरीं १
कृष्णकुन्तला हिसडा दिला, सतीनें टाहो फोडिला
गोरामोरा जीव झाला, हांक देई भरतारा २
'धांवा! धांवा! धर्मराया, रक्षी वेगें तव जाया
ना तरी भ्रष्टवील काया, खल, सूज्ञासमोरी ३
अन्धपुत्र माण्डी दावी, सूतपुत्र टाळी वाजवी
दुःशासनापासोनि सोडवी, अजातशत्रो! या सरीं ४
'पाण्डव गुलाम अमुचे' वदती, 'सेवक' म्हणुनी टाळया पिटती
'शतबन्धूंची दासी' म्हणती, दुक्ख मातें न साहवे ५
पुरें वर्तणें सत्यधर्मी, घाय घातला माझिये वर्मी
काय म्हणोनी ऐसिये कर्मीं, शीर्ष खालीं नमवितां! ६
आर्यपुत्र! धर्मराज, पट्टराज्ञीची घेती लाज
निमुटपणें बसतां आज, षण्ढ कांहो जाहला! ७
भीमराया लाज राखी, गदाप्रहारें चिरडून टाकी
कौरवातें युद्धीं जिंकी, स्वप्रताप दावोनी ८
उठा उठा हो नरेश, दुःशासनें ओढुनी केश
भ्रष्टवावया बघतो खास, कैसें वीरा साहवे? ९
नकुल सहदेवा माद्रीसुता! खलरिपूनें मात करितां
निर्बलापरी स्वस्थ बसता, आग लागो पुरुषत्वा १०

मृगेन्द्राचा श्रेष्ठ भाग, भालू लुटतां न ये राग
हृदयान्तरीं न होतां आग, नपुंसककर्म आचरितां ? ११

स्वयंप्रकाशित सूर्याला, कां तमिस्रेनें व्यापिला ?
पूर्णिमेच्या कां शशीला, खद्योतानें दिपविलें ? १२

जळों शस्त्रें अस्त्रें अवघीं, शौर्यशक्ति जळो वेगीं
पत्नीलज्जा रक्षण्यालागी, बाहू ज्याचे न स्फुरती' १३

आक्रोशली पाण्डवसती, सूज्ञहृदयीं ये भरती
धर्माची न ढळे शान्ती, कौरव हर्षें दाटले ? १४

भीम उठे उसळी घेउन, गर्जे 'धर्माचे हस्त जाळिन'
अर्जुनें त्यासी शान्त करून, सत्यमार्ग दाविला १५

हस्त जोडुनी द्रुपदसुता, भीष्म–द्रोणातें प्रार्थितां
लाचारपणें शिरें नमवितां, हृदयें ठाव सोडिला १६

भीष्मादिक श्रेष्ठजन, मिन्धे झाले अन्न सेवुन
कौरवातें स्पष्ट वचन, बोलूं न शके कोणीही १७

धृतराष्ट्रातें विनती करी, 'राजा! सुतातें आवरी
राजसभेमाजी अब्रूवरी, घाला घालिती कामान्ध' १८

एकाकी सांपडे कुरङ्गनयना, कामीं वेढिली पाण्डवाङ्गना
होता असहाय्य आणि दीना, धांव घेई आश्रया १९

स्वयें विषतरु वाढविला, पुत्रप्रेमें मोहान्धला
तनयातें रोधूं न शकला, दुष्टबुद्धि धृतराष्ट्र २०

सूज्ञीं घातल्या खालीं माना, कर्ण गर्जला 'दुःशासना!
आज सांपडे मृगलोचना, विवस्त्र करी झडकरी' २१

दुर्योधना ये उत्तेजन, आशावश होय दुःशासन
त्या दुष्टें हस्त घालुन, निरीस हिसडा मारिला २२

जीव विटम्बनें व्याकुळला, चित्तीं रुक्मिणीपति भाविला
दुक्खातिशयें कण्ठ दाटला, नीर लोचनीं थाटलें २३

यदुराय मनीं आठविला, गहिंवरुनि टाहो फोडिला
'धांव कृष्णा ! रक्षी मजला, लाज राखी या समयीं' २४

हाक प्रभूसी जैं दिधली, राजसभा कडाडली
घूत्कारें यज्ञसभा कोन्दली, हृदयें हादरलीं कुरुंचीं २५

हांक गेली द्वारकेसी, चिन्ता पडली श्रीकृष्णासी
त्वरें घेउनी वस्त्ररूपासी, अनन्त वस्त्रें पुरविलीं २६

दुःशासनें आटापीट केली, वस्त्रें राजसभा व्यापिली
महात्म्यानें लाज राखिली, नग्न सतीचें न दिसें २७

आनन्दली द्रौपदी सती, पाण्डव नयनीं अश्रू येती
शठ कौरव आश्चर्य करिती, भ्रान्त-चित्त जाहले २८

औन्ध, १।१।३२ प्रकाशन–काव्यरत्नावली, ऑगस्ट ३२

## 'कुमारिकांचा खेळ'

[ जाति–केशवकरणी ]

'मुग्ध मुलींनो ! खेळ खेळतां ? खेळाया घ्या मला'
'छे ग बाई घेउं नका याजला'
खुल्या दिलाच्या फुलत्या कलिका खेळाया उपवनीं
पातल्या वाटे स्वर्गीतुनी
वृक्षलतांचीं सुन्दर सुमनें गजबजुनी राहिलीं
त्यांत हृया खेळ खेळती मुली
कारंज्याचे तुषार पडुनी फुलल्या सुमनावली
चालला लपण्डाव आडुनी
निर्झर–वीची मृदुल चंचला नाच नाचतां वरी
मुलींनीं डुम्बावें अन्तरीं
वाहती सुगन्धित निर्झरिणीचे झरे
त्यामधें खेळती हंसहंसिका मुदें
वेचिती मृदुल ते किसलय कमलांतले
'उषा देवता लाजत गालीं येइ पहा आजला
छे ग बाई घेउं नका याजला' १

हिरवळ फुलली अरुण हांसला उषा लाजली अहा
लाजल्या सर्व कुमारी पहा
खेळ चालला भ्रमर जाउनी त्यांस विचारीतसे
'तुम्हाशीं खेळायाचें पिसें'
पाहुनि त्याला फार लाजल्या रोषयुक्त जाहल्या
'धटिङ्गण कुठुनी ये आजला

उधळुन देइल खेळ आपुला क्रीडा करुनी पुरी
नको ग ऽ यास खेळण्यापरी
लोचनांत भरली चञ्चल ही तरलता
देउनी त्रास हा तुम्हां अम्हांला अतां
अन् जिवा रमवुनी धरिल आपुल्या पथा
चका ग याच्या वाटे जाऊं खेळुं चला सत्वरी
लोटुनी त्यास आजला दुरी' २

वासन्ती, माधवी, मालती सर्वजणी खेळती
नाचती आनन्दें डोलती
सखा सावळा धांव घेउनी पाठीशीं लागला
बावऱ्या कुमारिका जाहल्या
पाठशिवणिचा खेळ चालला राज्य घेइ मग सखा
लागल्या लपावया बालिका
धाऱ्यावरती खेळ चालला गवसेना त्या कुणी
गुङ्गल्या खेळामधिं रङ्गुनी
सांपडे बालिका मुग्ध पहा त्यास ती
जिव झाला अर्धा लाजलाजली अती
त्या इतर कळधा तर अपसांतच हांसती
त्या बालेच्या वदनावर ये अरुणछटा माधुरी
जाहली धन्या हृदयान्तरीं ३

मुकुलितनयना मुग्धा बाला माङ्गल्याची खनी
उपजले गूढ भाव तन्मनीं

## १२

मुग्ध मुलींची दैना पाहुनि हास्य लोटलें किती
वाटला हेवा कलिकांप्रती
दैना झाली सर्व मुलींची मोद भरे उपवनीं
खेळती खेळ मुली डोलुनी
मधु सेवुनि जाई भृङ्ग तेथुनी दुरी
विमनस्क जाहल्या कलिका बहु अन्तरीं
तैं शीतल झुळझुळ वितरी नव माधुरी
आणि पुनरपी डोलुं लागल्या कलिका प्रेमाकुलें
क्रीडनीं चित्त पुन्हा रङ्गलें ४

औन्ध, १९।६।२८ प्रकाशन-सरोज, २९

१२

## 'जीवित-साफल्य'

[ जाति--अवनी ]

भरतभूमि आज कशी हीन दीन झाली
पूर्वविभव लोपुनि ये परवशता भालीं
धिग् नच स्वातंत्र्य हाय !
तेजोवेध पूर्ण होय
तिमिरजाल पसरुनिया ज्योत कां निमाली ?
नौबत ही दुमदुमली
हिन्दभूमि हादरली
शौर्यं तुझें दावाया हीच वेळ आली
अविरत करि राष्ट्रकार्य
प्रगटवि तव अतुल धैर्य
गातिल यश पुत्रपौत्र, हीच तव हमाली
बन्धन हें संसृतिचें
झडकरि तोडुनि साचें
मातृभूमिरक्षणार्थ त्वरित झांप घाली
जीवाची सोड आस
सत्याची धरुनि कास
टाक उडी सङ्गरांत, ईश तुझा वाली
दास्यमुक्त हिन्द करी
आनन्दें मृत्यु वरी
जीवितसाफल्य तरिच साम्प्रत या कालीं

औन्ध, १।५।३० प्रकाशन—केसरी, १०।५।३०

## 'वैफल्य'

[ सुनीत-वृत्त-श्यामला ]

तारुण्य अङ्गीं बाणलें नी विद्ध झाली बालिका
ना मानसा स्पर्शी तरीही भावना वैवाहिका
ही वेषभूषा पाहुनी किञ्चित्क्षणीं सञ्चारली
भावी सुखाची स्वप्नभू हृन्मन्दिरीं ओथम्बली
त्या गौर भालीं रेखिली रक्ताङ्कता ती चन्द्रिका
अन् कृष्णवस्त्रीं दिव्यशी स्वर्गीय शोभे तारका
मन्दस्मिता चाले पथीं गात्रीं विलासे मुग्धता
सौन्दर्य साधें मोहवी नेत्रीं खिळे तेजाळता
टाकी पदें ही सत्वरी ज्योत्स्ना सभोंतीं फांकते
ओष्ठद्वयाची सम्पुटी ती हीरपङ्क्ती कोन्दते
या कुन्तलीं खोवीयली नाजूक कुन्दाची कळी
भासे जणूं सौदामिनी ही चञ्चला मेघांतली

† † †

ज्वानींतलें सौन्दर्य बाले! हाय! व्हावें फोल ना!
कौमार्य गे पावेल का सम्पूर्णता लग्नाविना?

प्रकाशन—काव्यरत्नावली, डिसेम्बर १९३०

## 'उत्तिष्ठत जाग्रत'

[ जाति–मुद्रिका ]

फडकते नभःप्राङ्गणीं स्वैर ही ध्वजा
या हिन्दराष्ट्रदेवीची देतसे हांक पूर्वजा
ही ध्वजा देविच्या यशोमन्दिरावरी
मृतपुत्र हिन्दमातेचे शङ्खलाबद्ध ना परी
निस्तेज होउनी खिन्न काय जाहलां
आर्यांचे वंशज ना हो दास्यांत कसे गुङ्गलां !
दुमदुमे नभीं हा स्वराज्य डङ्का पहा
आकाशीं नाद भरोनी व्यापिला हिन्ददेश हा
गगनांत नाद भरुनिया युद्धसङ्गरीं
बघ उठे प्रतिध्वनि याचा रङ्गांत दङ्ग कां तरी ?
ही हिन्दभूमि माखली रक्तरङ्गणीं
मातृभू रुते पङ्कांत उद्धरा सज्ज होउनी
हे सिंह आर्यभूमिचे खञ्चले मनीं
नैराश्यपटल कां दाटे? जाहली खिन्न मेदिनी
देशार्थ चला सङ्गरीं पुढें धांवुनी
स्वातंत्र्य आज मिळवाया होमांत बली अर्पुनी
चहुंकडे पेटली खाय मातला कली
पोटार्थी बनुनी सारे परक्याला देती बळी
दास्याची बेडी रुते पदीं सम्प्रतीं
हें जिणें गुलामाचें कां आचरितां दुक्खद अती
परसत्तेखालीं भरडुन जनता निघे

परसत्ताजूं उचलाया कोणीहि परी ना धजें
द्वेषाची बिजली थिजे काय आजला ?
जा करा फिरोनी हल्ला स्वातंत्र्यहोम पेटला
हादरे गोल स्वातन्त्र्यनाद पसरुनी
बन्दींत कितीजण गेले प्राणान्त दुख्ख साहुनी
स्वातंत्र्यासाठीं परागन्द जाहले
प्राणास अर्पुनी मोदें दुर्दान्त वीर आपुले

† † †

सौख्यार्थ धुण्डिती त्रिखण्ड जन सारखें
पावुनी निराशा अन्तीं सौख्यास होत पारखें
तें सुखस्वप्न व्हावया खरें आजला
जागवा ज्योत देहाची उद्धरा मायभूमिला
ही पहा मधुर हांसते यशोदेवता
कां निराश होउनि जातां अनुसरा योग्य या पथा
सुममाला घेउनि उभी नभोमन्दिरीं
स्वातंत्र्ययुद्धहोमांत बलि देउनि जा सत्वरीं

औन्ध, ४।६।२९ प्रकाशन-स्फूर्ति, आक्टोबर २९

# 'क्षणभङ्गुर जीवित'

[ जाति–बालानन्द ]

प्रभात झाली
पुष्पें फुललीं
दंवांत भिजलीं
किरण रवीचें तिथें दिसें     सुवर्णबिन्दू वाटतसे ?     १

हरित शालुनें धरा नटे     सरित् मेखला कटिं विलसे
सलिल तियेचें चमकतसें     रत्नज्योतीसम भासें
कळी उमलती हांसतसे     मीपण तिजला जडवि पिसें
रूपखनी लावण्याची     उन्मादित सौन्दर्याची
मनोज्ञ सुषमा ये तिजला     तारुण्याची हो लीला
कलिका फुलली
बहरा आली
पुनरपि मुकली
अतर्क्य काळाची लीला     अधोवदन झाली बाला     २

यौवन अवघें मावळलें     फलावांचुनी फूल गळें
मधर गन्ध भवतीं उपजे     वास न घेतां कोमेजे
वाटे तिजला जग भुलवूं     रसिकांच्या हृदया फुलवूं
भुलवूं फुलवूं सर्वांना     आशा वेडी हीच मना
आस–माधुरी
लोपे सारी
घाव जिव्हारीं !
अवघ्रात तें सुम वेडें     होउनि अंतिं निर्माल्य पडें     ३

जोन्स, ७।८।२८     प्रकाशन–'सरोज', २९

## 'तो आणि ती'

[ जाति–भूपतिवैभव ]

अन्धार मातला नयनां कांहि दिसेना
आकाशीं दैना ताऱ्यांची बघवेना
घन कृष्ण मेघ नभिं जमले हां हां म्हणतां
बेफाट जाहली सुरू तयांची सत्ता
गडगडाट भीषण चाले आकाशांत
बिजलीची फाके प्रभा क्षणोक्षणिं त्यांत
पशुपक्षी झाले त्रस्त रात्रिच्या काळीं
शोधिती निवासस्थान कोठरें जाळीं
भेसूर केंकणें निबिड वनान्तरिं चालें
बेफिकीर डौलें वृक्षराज परि डोले
    घुबडांचें चाले घू घू । भोंवतीं
    सैराट वाहतो वायू । भोंवतीं
    हैराण मेदिनी होई । भोंवतीं
कडकडाट होतां चपला क्षणिं कोसळली
तो वृक्षराज उन्मळुनी पडला खालीं

पुणें — प्रकाशन–काव्यरत्नावली, सप्टेम्बर ३१

## ‘अन्नपूर्णा’

[ जाति-दिण्डी ]

‘बाळ तापानें फणफणून गेला
जीव त्याचा हैराण फार झाला
जरा येऊं द्या कींव तुम्हांला हो
पोर तुमचें समजून भाव राहो १
पती नाहीं बन्धु ना बाप नाहीं
एकली मी बाळास कोण नाहीं
स्थिती व्याकुळ पाहून पांखराची
वाटतें मज काळीज कुणी वेंची २
बाळ माझा हा फार हो भुकेला
घांस गोळाभर चार दिन न त्याला
दया दावूनी करा अन्नदाना’
हृदय भरलें अन् शब्दही फुटेना ३
विनति ऐकुनि गर्जला सूज्ञ भाऊ
‘चालती हो दारांत नको राहूं
तुझ्या बापाची पेण्ड इथें काय ?’
बोल ऐकुनि जाहली खिन्न माय ४
तोंच आंतूनी खूण कुणीं केली
परसदारानें आंत बोलविली
अन्न मिळतां सानन्द वाट चाले
अन्नपूर्णा पाहून नेत्र धाले ५

औन्ध प्रकाशन-काव्यरत्नावली, ऑगस्ट ३१

## 'कसली चिन्ता तुज लागली ?'

[ जाति–केशवकरणी ]

सख्या बांधवा ! म्लान वदन कां ? काय दशा जाहली ?
कसली चिन्ता तुज लागली ?

सुखाकारणें झटसी वायां दुक्ख मात्र होतसे
जीव कां व्यामोहीं फसतसे !

आत्मोन्नतिचा पथ निष्कंटक करावया इच्छिसी
निर्भया वृत्ति न कां जोडिसी ?

भूमाता तुज साह्य कराया सज्ज असे निशिदिनीं
कशास्तव खिन्न होशि तूं मनीं ?

उद्योगाचा नाङ्गर धरुनी तण काढी उपटुनी
साहस-वृषभातें जोडुनी

उत्साहाचें बीज पेरुनी राबुनि शेती करी
ईश तो कृपा करिल तुजवरी

पर्जन्य–कृपेच्या पडतिल तेथें सरी
मग पिकें डोलुनी फुलतिल वाऱ्यावरी
धनधान्य विपुलसें देइल तुजला हरी

आनन्दानें अविरत सेवा भूमातेची करी
चिन्ता वाहिल तो श्रीहरी

औन्ध, ९।५।३०

प्रकाशन–किर्लोस्कर, जुलै ३०

## 'मोहिनी'

[ जाति–प्रणयप्रभा ]

तव रूप पाहुनी हृदय खुलें
कां भूल पडे मज ? जीव झुले ॥ ध्रु० ॥

ओष्ठसम्पुटीं हास्य विखुरतां
कुन्दकळ्या हृदयास वेधितां
जीवभृङ्ग हा प्रमुदित होता
पूर्ण तुझ्यावर मन भुललें
तव रूप पाहुनी हृदय खुलें १

भृकुटीचें धनु सज्ज करूनी
नयनीचे शर तीव्र वर्षुनी
विद्धियले मम हृदय भेदुनी
जीव हंस मानसीं डुले
तव रूप पाहुनी हृदय खुलें २

काळे कुरळे कुन्तल उडती
भुरभुर कैसे वाऱ्यावरती
जणूं वाटते फास घालिती
मानस आकर्षसी खुळे !
तव रूप पाहुनी हृदय खुलें ३

नजर बावरुन अस्थिर झाली
सुन्दरता तव कृष्ण कुन्तली,
मधुर हास्य, ती खळी कपोलीं

न कळत मज तूं मोहविलें
तव रूप पाहुनी हृदय खुलें ४

अवयव कोमल सरळ नासिका
रूपमती नवयौवन लतिका
गानिं फिको तुजपुढें सारिका
अमोघ वाणें जिंकियलें
तव रूप पाहुनी हृदय खुलें ५

कला स्वर्गिची कां अवतरली ?
काय नभीची उषा पातली ?
बीजेची जणुं कोर भासली
अंगिं पुरी मुग्धता खिळे
तव रूप पाहुनी हृदय खुलें ६

नवाजीक सौन्दर्य पाहुनी
स्मृती मानसीं होय राहुनी
आगळीक कां घडे मानिनी ?
स्मृती होउनी हृदय उलें
तव रूप पाहुनी हृदय खुलें ७

औन्ध ४।६।२९ प्रकाशन-काव्यरत्नावली

## 'सागरीं लोटिली नाव कुणीं ?'

[ जाति - प्रणयप्रभा ]

ध्वज उच्च शिडावरि फडकवुनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ? ॥ ध्रु० ॥

घन तम पसरे चोहिकडोनी
मेघ भिवविती भीषण गर्जुनि
चपला चमके त्यांत मधूनी
वर्षति जलधारा वरुनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ? १

वेगें धांवें पवन भरारुनि
खवळे सिन्धू ये फेसाळुनि
ताण्डव नृत्यीं जाई रङ्गुनि
वेळ भयानक ही असुनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ? २

लाटा उसळुनि नभास भिडती
सैरावैरा जलचर धांवति
नाव झोकते खालीं वरती
विकट मार्ग ऐसा असुनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ? ३

छिद्र पाहिते स्वार्थी जनता
होत सज्ज ही स्वकीय घाता
अथाङ्ग सागर थरकवि चित्ता

म्हणुनि काय वदतां भिउनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ?

पूर्ण विरागी नाविक वरती
वल्हीं मारुनी तुज दावीती
राष्ट्रकारणीं सोडी भीती
वाफ नको दवडूं वदुनी
सागरीं लोटिली नाव कुणीं ?

कर्णधार हा दिव्य बैसला
नौका न्याया परतीराला
मार्ग दाखवी अज्ञ जगाला
जागृत होउनि बघ नयनीं
सागरीं लोटिली नाव कुणीं ?

औन्ध, १५।१।३१ प्रकाशन—केसरी, १३।६।३१



## 'आशा-निराशा'

[ जाति—चन्द्रकान्त ]

प्रेमाश्रूंची मौक्तिकमाला चरणीं वाहून
हस्त जोडुनी पुनरपि कान्ता विनवी स्फुन्दून
'जावें युद्धा यश मिळवावें' कण्ठ भरुनि आला
बोल निघेना, मूकभाव दो हृदयांना कळला
प्रेमालिङ्गन देउनि कष्टें कान्त दूर झाला
रणाङ्गणावर सजण चालला शान्ति न हृदयाला

† † †

समरभूमिवर कितीक योद्धे मुकले प्राणास
वृत्त थरारुन घरें पाडितें कोमल हृदयास
'देवा ! धांवा, पावा राखा प्राण विसाव्यासी
काया माझी ओवाळुनही टाकिन तुम्हासी'
परोपरीनें प्रभुस आळवी खळ ना अश्रूंना
झोंप येइना काम सुचेना लव ना शान्ति मना

† † †

वीर निकामी परत बैसले सदनीं येऊन
दारीं पाहे वाट पतीची डोळे लावून
दिवसामागुन दिवस लोटले पति न येइ अजून
मस्तक भडकें उदास झाली काळिज करपून
लोकां वाटे वेडी बनली जन सारे हंसले
तीही हंसता कींव करोनी मनांत हळहळले

† † †

निर्झरकाठीं प्रेमालापीं युगुल दङ्ग झालें
गाढालिङ्गन देति परस्पर असें स्वप्न पडलें
युद्धाचें अतिरम्य कथानक रङ्गामधि आलें
कान्त साङ्गतो कान्तां ऐके भान न मुळिं उरलें
धाडधाड हा शब्द ऐकता स्वप्नसृष्टि विरली
दारावरती थाप बैसतां भानावर आली

† † †

'लढतां लढतां देह ठेविला' वार्ता ऐकून
मूर्छित पडली, तत्क्षणिं उठली ती वेडी बनुन
वेडे चाळे करूं लागली सदना त्यागियलें
निर्झरकांठीं निघून गेली जिथें चित्त रिझलें
कुणा कुणाला दर्शन पडतां सांगे प्रेमानें
'लढतां लढतां देह ठेविला माझ्या नाथानें'

औन्ध, ११।१२।२८ प्रकाशन-सरोज, २९

## 'रणशिङ्ग'

[ सुनीत–वृत्त–मदालसा ]

चहुबाजूनीं भडका उठे दिक्प्रान्त सारे व्यापिले
दुष्काळपीडित भारता दारिद्र्यकाळें ग्रासिलें
कर्तव्यविन्मुखतेमुळें निस्तेज जनता जाहली
तें वैभव स्वातन्त्र्य तें ती शरवृत्ति विलोपली
वस्त्रें विदेशी दाविती खोटें विलोभन सम्प्रती
सत्त्वाभिमाना पारखे, ध्येयांत होइ परागती
नेली लुटोनी सम्पदा वाग्जालिका पसरूनिया
स्वातन्त्र्य हरुनी घेतलें मधुमोहिनी घालूनिया
गान्धी जवाहर मोहरे कारागृहान्तरिं खेचले
अपराधही लव ज्या न त्या सन्नामदें चिरडीयले
गतवैभवार्थ सुजाणते सद्धर्मयुद्ध पुकारती
सैनीक योद्धे यावया रणशिङ्ग साम्प्रत फुंकिती

† † †

ही घोषणा ऐका उठा सामर्थ्य आत्मिक दाखवा
स्वातन्त्र्य मूला मेळवा कीर्ति दिगन्तीं वाढवा

औन्ध, ५।११।३० प्रकाशन–स्फूर्ति, ऑगस्ट ३१

# प्रियेस

[ सुनीत–वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

हातीं घालुनि हात तेथ सरिताकाठीं मुदें बैसलों
स्कन्धीं टाकिशि मान तूं मम, तुझ्या अश्रू उभें लोचनीं
माझ्या आणि तुझ्या मनांत विमले ! भावैक्यता पाहुनी
दुक्खें या जगतांतलीं विसरुनी धन्यत्वही पावलों
होतां तूं लवमात्र दुक्खित अति व्याकूळ मी होतसें
नेत्रीं मिस्किल भाव, सस्मित मुखश्री देखुनी अन्तरीं
हर्षोर्मी उठती नवोनव, दिसे आनन्द या भूवरी
सामावे सुखदुक्ख त्वन्मुखि, मला तूझें जडोनी पिसें
प्रेमें रानफुलें कितीक तव मीं वेणीमधें गुम्फिलीं
माना वेळुनि पाहशी मजकडे, लज्जा कपोलीं खुले
तूतें ग्रान्थिक काव्य ना कळतसे वाटे मला त्यामुळें
लोपे कृत्रिमता, तुझ्या कृतिमधें काव्यात्मता राहिली

† † †

दुक्खानें भरल्या अशाश्वत जगीं तूं आणि मी आजला
भोगूं शाश्वत सौख्य निर्भयपणें आनन्द विश्वांतला

औन्ध, ११।४।३३

## 'सुप्त भारतास'

[ वृत्त–पाण्डव दिडकी ]

हिन्दभूमी सम्प्रती ही सङ्कटीं अन्धारली
निद्रिता कां जाहली ?

वञ्चकाच्या मोहिनीनें भारताला वेढिलें
नागवूनी टाकिलें

भारताच्या वीरपुत्रा काय झाली शर्वरी ?
दास्यरूपीं जू शिरीं

बोचुनी शल्यें हृदीं काळीज कैसें फाटतें
तीव्र दुक्खें गान्जतें

ये जरी शैथिल्य अङ्गीं जीव हा शेफारला
नाचरङ्गीं रङ्गला

तेजहीना शौर्यहीना हिन्दभू ही जाहली
स्वार्थवृत्ती माजली

मर्दशूराची भरारी आज कोठें गुङ्गली
दास्यपङ्कीं लोपली !

वीर जाज्वल्याभिमानी श्रीशिवाजी आपुला
स्त्रैण तुम्ही जाहलां

आठवा ते शौर्यगाजी त्या स्वराज्या आठवा
सुप्तवन्ही चेतवा

काय त्यांचीं शूर कृत्यें, काय युद्धीं सूज्ञता !
आज वाया भाण्डतां

जीर्ण रूढींचीं पिशाच्चें फेर पिङ्गा घालिती

दुर्बला भेडाविती

मासडोनी तोड वेगें रूढिचीं हीं बन्धनें

जोड शक्तीसाधनें

जीविताशा सोडुनी स्वातन्त्र्ययुद्धीं हिन्दवी

मायभूमी वांचवी

औन्ध, १०।५।२९ प्रकाशन-स्फूर्ति, जुलै २९

## ३१

## 'समाधीपुढें'

[ जाति–चन्द्रकान्त ]

पन्चवटीच्या वळणावरती जुना पूल ठाके
झुळझुळ वाहे निर्झर खालीं मन्द तेज फाके
गर्द सभोंतीं रान विराजे विहग तिथें गाती
आनन्दानें खेळ खेळती मोदभरित चित्तीं
पूर्वबाजुला पहा समाधी त्या राजर्षींची
विमल कीर्तिनें फिकी पाडिते प्रभा काय रविची ?
निर्झरिणीचें स्रोत समोरी सोडुनि भिन्नत्व
एक होउनी ऐक्याचें जणुं ठसवितात तत्त्व
गर्द फुलांच्या वेलीमधुनी मार्ग एक शोधी
दुजा वाहतो उघड्यावरुनी उडी घेत वेगीं
तिथेंच जवळी एक चिमुकलें कळकीचें बेट
डुलें बागडें आनन्दानें गूढ गीत गात
डौलदारशा बेटाजवळीं ध्वजा नभीं फडके
पूर्विल अपुल्या पराक्रमाची साक्ष देत कुतुकें
मयूर रिझवी राजर्षीला प्रेमें नाचून
सुस्वर कोकिल गात पन्चमी विहरे भंवतून
सन्ध्यादेवी हर्षभरानें नटुनि इथें आली
केशपाश बान्धुनी नीटसा मोदानें न्हाली
रविकिरणाचें करीं निरान्जन घेउनिया आली
राजर्षीचें स्वागत करण्या सिद्ध काय झाली ?

मा
ल
ती

गुञ्जगारा घालुनी कळकिच्या त्या बेटाभंवती
पवनराज गातसे आरती या राजावरती
मान द्यावया वाग्देवीचे भाट नित्य येती
वाक्पुष्पांची माला गुम्फुनि जना तोषवीती

† † †

समाधिस्थ या राजर्षीची वीतरागवृत्ती
पावित्र्याच्या निगूढ भावा तरंगवी भंवती

औन्ध, ८।५।२५ प्रकाशन–विनय, सप्टेम्बर २९



# 'कां आत्मवञ्चना तूं करिशी ?'

[ जाति–प्रणयप्रभा ]

'जनरीतच ही' ऐसें वदसी
कां आत्मवंचना तूं करिशी ? ॥ध्रु०॥

हृदयभावना व्यक्त कराया
धीर न होई तुज या समया
मजवर धरिसी रोष कासया
हृद्बन्ध खोलुनी पहा कशी
कां आत्मवंचना तूं करिशी ? १

भाव तुझे जे व्यक्त करीती
'दुक्खावर मम डागचि देती'
वृथा कशास्तव तुजला भीती
अपमान गमे मानिनि ! तुजसी ?
कां आत्मवंचना तूं करिशी ? २

'व्रणावरी मम काक जणूं हे
दुक्ख देति मजला नच साहे'
कशास म्हणसी व्रण परि आहे
हें गुह्य बोलुनी तूं फसशी ?
कां आत्मवंचना तूं करिशी ? ३

'पूर्ण विमल मम हृदय असूनी
हंसत देति मज पङ्कि लोटुनी'
मलिन होय कां हृदय अर्पुनी !

भावना खुळी ही हृदिं धरिसी
कां आत्मवंचना तूं करिशी ? ४

वैभवकालीं तुजला स्तविती
आपत्कालीं खडे मारिती
स्वार्थलुब्ध, मी त्यांतिल व्यक्ती
मानुनी मला दूषण देसी
कां आत्मवंचना तूं करिशी ? ५

उपदेशाचा आव आणिसी
रीत जनाची कुणा शिकविसी ?
नशीब फुटकें म्हणुनि बैससी
हा लपंडाव कां चालविसी ?
कां आत्मवंचना तूं करिशी ? ६

व्योम व्यापिलें अभ्रपटांनीं
मुऱ्हें दाटलें चौबाजूंनीं
शशाङ्ककान्ती जाय लोपुनी
तो शशाङ्क गमतो तुज दोषी
कां आत्मवंचना तूं करिशी ? ७

कलानिधीचा दोष नसूनी
कुपित होशि त्या अवमानूनी
कशास घेशी त्रास करूनी
हा दोष कुणाचा विस्मरशी
कां आत्मवंचना तं करिशी ! ८

३५

कोडिसवाणें तव मुख विमले!
भीतीनें झाकळून गेलें
सोड बहाणा झणीं तूं खुळे!
प्रिय ईप्सितार्थ हो सिद्ध कशी
कां आत्मवंचना तूं करिशी?

औन्ध, २३।१।३२

## 'सभोंवार'

[ जाति–मुद्रिका ]

मानसीं नवोनव उद्भवती कल्पना
परि कुणापुढें माण्डाया ना धीर होतसे मना १

उघडितां ओष्ठसम्पुटा जरा बोलण्या
भेसूर हांसुनी देती मानसा अमित डागण्या २

आत्मीय जिव्हाळा कुठुन येइं त्या जनां
अपसांत करुनि टीकेला उगवती सूडभावना ३

ना प्रेमळतेचा शब्द हृदयिं वसतसे
परि परुषभाषणें सारीं उधळिती मजवरी कसे ! ४

'हा मूर्ख' तसा 'तो शिष्टहि पाजी असे'
परनिन्दा करिती ऐसी, रन्जीस जीव येतसे ५

ना कधीं मुखांतुन सद्विचार उमटती
काढिती उणें सर्वांचें टोमणे सदा मारिती ६

प्रोत्साहन शाब्दिक! तेंहि भाग्य ना मला
तशि सहानुभूती माझ्या वांटयास न ये आजला ७

स्तब्धता बघुनि मम वदती कुत्सितपणें
आंतल्या गांठिचा आहे जळफळती द्वेषाग्निनें ८

नवनवोन्मेषिणी रम्य कल्पना मनीं
किति धुमाकूळ घालोनी वर येइ पुन्हा उसळुनी ९

जोंवरी पसरलीं सभोंवार हीं भुतें
तोंवरी हृदय उघडाया काव्याविण ना स्थान तें १०

औन्ध, ७।४।३३

## १७

# 'न्यायाचा बाजार'

[ सुनीत-वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

आली हीन दशा प्रजेस, न कुणा स्वातन्त्र्यही राहिलें
त्यांचे पिण्डवडे कितीक निघती त्यांनींच ते साहिले
आर्तांच्या परिपालनार्थं विभुनें सत्तापदीं स्थापिलें
इच्छा भूपतिची करून विफला सत्तामदें धुन्दले
शास्ते हे म्हणवून आपण जगीं दीनाप्रती गान्जिती
होवोनी परपिण्डपुष्ट वरती प्रौढी किती दाविती
दीनातें छळिती विलोभुनि धना, सत्या पदीं दापिती
दुक्खें बोलुनि दावितां पुनरपी द्वेषें जळों लागती

† † †

साधत्राण करावया महिवरी दुष्टासि दण्डावया
सद्भावें नयमंदिरें उभविलीं न्याया जनां द्यावया
न्यायाधीश म्हणोनि ज्या बसविलें न्यायार्थ उच्चासनीं
देती न्याय विचित्र राजपुरुषा राजीखुषी ठेवुनी

† † †

स्वार्थी मानवराक्षस प्रतिदिनीं बाजार हा भेसुर
माण्डोनी छळितात दीन, बघुनी शोकें उलें अन्तर

औन्ध, १३।११।३० प्रकाशन-स्फूर्ति, जुलै ३१

## 'गुलामांचा बाजार'

[ जाति–दिण्डी ]

तत्त्वनिष्ठा सोडून धन्यासाठीं
मनोभावें बान्धिले पोट पाठीं
अर्हनिश मीं सेविले प्रभूपायां
परी जाती श्रम शेवटास वायां १

कुणाचाही केला न मनीं हेवा
बहू केली झिजवून देह सेवा
परी अधिकारी होय ना प्रसन्न
भ्रान्ति पोटाला कसें मिळे अन्न २

हेच अधिकारी जाहले वरिष्ठ
आणि असलों आम्हीहि जरि कनिष्ठ
तरी दोघेही धन्याचे गुलाम
जात दोघांची एक, भिन्न नाम ३

गुलामांतहि हा श्रेष्ठ तो कनिष्ठ
भेद करणें वाटे न मला इष्ट
आणि दोघेही दीन दीन झालों
धुरीखालीं एकत्र जुंपिलेलों ४

जीव झाला हैराण करुनि सेवा
आणि त्यांतुन हे साधतात दावा
गुलामांचा बाजार भरे येथ
परी द्वेषें अन्योन्य धमसतात ५

औन्ध, १०।४।३३

३९

## 'शुक्राची चान्दणी'

[ जाति–चन्द्रकान्त ]

नीलाकाशीं नभोमन्दिरीं कोण देवता ही
मन्द पाझरे तेज भूवरी फुलुनी लवलाही
कां रजनीच्या कृष्णकलापीं पुष्प खोवियेलें
प्रकाश नोहे मधुगन्धें हें भूतल दरवळलें
रजनीच्या कां मुखचन्द्रावर तिलक कुंकुमाचा
भालप्रांगणि विरजतो हा नवत्या बहराचा
काय निशाराज्ञीच्या विलसे खळी कपोलींची
दिपवी तेजें नेत्र बिन्दली कां भालावरची
तमोदेवता गुम्फित असतां नवमौक्तिकमाला
जणूं गुंफिली तेजोराणी विसरुनि भानाला
नभोमानसीं राजहंस का विहार करित असे
विधुकमलांतिल नक्षत्रांचा पराग सेवितसे
कृष्ण-रुक्मिणी खेळत होते प्रणयाची केली
निखळुन पडला तेजोराशी कौस्तुभ त्या वेळीं
तेव्हांपासुन हृदयावरचा मणी कौस्तुभाचा
मार्ग धुण्डितो वेड्यावाणी नभःप्रदेशाचा
कुण्या नृपाची लेक चमकते नभोमंण्डळांत
सख्या तारका जमवुन संगें दंग खेळण्यांत
विधिमदनें विधुहृदयीं का हा बाण मारिलासे
झुरत तिच्या प्राप्तीस्तव गगनीं निशानाथ भासे

गगनमण्डळीं कोण बालिका ऐटदार बसुनी
अबलक घोडा फेंकित आली ज्वानींतिल तरुणी

सायन्तनिं अभिसारिका इथें नटुनि काय आली
प्रियकर भेटीस्तव उत्सुक ही गमते या कालीं

स्वर्युवतीच्या सौन्दर्याची मूर्तिमन्त कान्ती
भूलोकींच्या पावित्र्याची ऊर्जस्वल मूर्ती

हिरे माणिकें कातरवेळीं भानु नभीं उधळी
कोहिनूर हा तेजशलाका फेंकितसे खालीं

चंदेरी दर्यांत ठेविलें दीपगृहा रचुनी
अमर वल्हविति नक्षत्रांच्या नौका सजवूनी

पैलथडीला शशाङ्कराणा ऐलथडी बाला
मधून वाहे स्वर्गंगा ही भरून दुथडीला

स्वर्लोकींची कुणी अप्सरा नंदनवनलतिका
गगनपटल हें दूर करोनी निरखी भूलोका

औन्ध, प्रकाशन-लोकमित्र, एप्रील ३०

४१

# 'राजा आणि नर्तकी'

[ सुनीत-जाति-चन्द्रकान्त ]

नीलसिन्धुच्या हृदयावरती कातरवेळेला
  सुवर्णधारा स्रवे दिनमणी फेकुनि करमाला
उत्तरभागीं पर्वतशिखरीं दुर्गम कान्तार
  दिनप्रभेचा चरमचषक तें प्राशी अनिवार
दक्षिणेस या वनराजींतुन दृग्गोचर होती
  गरिबांच्या झोंपड्या सानुल्या नयना मोहविती
रजनीदेवी मुखावरूनी तिमिर पटल घेते
  जानपदीं प्रज्वलीत करिती ललना दीपातें
सुप्तबालका अनिमिष नेत्रीं अवगुंठित माता
  अवलोकी स्नेहभरें तैसें दृश्य गमे आतां
सृष्टीच्या विस्तीर्ण भव्य उपवेशनशाळेंत
  नवरंगी गालिछा जणूं हा गमतो भूप्रान्त

† † †

सृष्टिनर्तकी नक्षत्रांची माला घालून
मी राजा मजपुढें नाचते नवरंगांतून

औन्ध, ८।४।३३

[ रवीन्द्रनाथ टागोर यांच्या एका वर्णनावरून ]

## 'आवाहन'

[ वृत्त - पाण्डव ]

शूद्रवृत्ती आचरीसी होउनी तेजोवध
लोपलें पौरुष्य ? निद्रा त्यागुनी हो सावध
दास्यसर्पें दंश केला, चेतना कां लोपली ?
शौर्यभानू मावळोनी शर्वरी कां पातली ?
जाहली निष्प्राण माता पारतन्त्र्यें विद्धिली
काय शौर्यश्री जळाली त्यामुळें दास्यानलीं ?
शौर्य तेज स्फूर्ति टाकी राष्ट्रकार्यीं वोपुनी
चित्त काया वित्त सारें प्रेमभावें अर्पुनी
जातिभेदाचें पुराणें वस्त्र देईं फेकुनी
उच्च मी अन् नीच तो ही भावना दे टाकुनी
ऐक्य राखोनी समाजीं स्वार्थवृत्ती सोडुनी
मृत्युची भीती झुगारी सिद्ध युद्धा होउनी
हिन्दभूमी गांजली दारिद्र्यवज्रें भंगली
मातृदास्यध्वान्त नाशी दैन्य वेगें निर्दळी
ऊठ वीरा धाव घेई मोहपाशा सारुनी
मेळवी दुर्लंघ्य कीर्ती मायभू उद्धारुनी

औन्ध, ३।५।३०                    प्रकाशन–प्राविण्य, जुलै ३०

## 'सङ्गमोत्सुकद्वय'

[ जाति-केशवकरणी ]

१

चपलेसम तूं सखे टाकिलें मजला पथि भारुनी
जिव्हारीं अदयघाव घालुनी
हृदयीं शल्यें बोचुनि झाला अर्धा जिव मोहिनी
प्रफुल्लित करी सुधा वर्षुनी
मोहवुनी मज वेड लाविलें जादुगिरी दाविली
भटिची आस तुझ्या लागली
छेडिली तार हृदयाच्या वीणेंतुनी
गाइलें गान मी भावनेंत गुंगुनी
प्रेमांत रंगलों लाज जगीं सोडुनी
आळविलें पिळुनिया हृदय हें दया न येई तुला
मनींचा हेत विफल जाहला

२

नाना परिचे रंग भरूनी कौशल्यें नटविली
चित्रिका हृदयीं मीं रेखिली
साजसजावट पाहुनि खुलले मानसही रंगलें
वाटलें धन्य आज जाहलें
राज्य चालवुन मनांत रचिले डोलारे उंचसे
कल्पिले होतिल ते सफलसे

किति वेळ तरी मीं विलास केला मनीं
राजसा सख्याला हृन्मन्दिरिं बसवुनी
हांसतां खेळतां लाजलें ग पाहुनी
रंग विराले हास्य निमालें फलक छिन्न जाहले
नेत्र ते अश्रूंनीं डंवरले

प्रकाशन–काव्यरत्नावली, लोकमित्र,
फेब्रुवारी ३०



## 'महात्म्यास'

[ जाति–मनमोहन ]

हा हिन्दभूमिचा भाग्यभानु अजि येत असे उदयास
तेज तिज ना सहन होई
लोचनातें मिटुनि घेई

जाहली लुप्त अविलम्बें रजनी आवरुनी तमपाश
ज्या धुक्यानें मलिन साचें
रूप यौवन हो उषेचें

तें भाग्यरवीच्या दर्शनमात्रें जाय मऱ्हें विलयास
पाहतां नभसीय कान्ती
धन्य होई सूर्यदूती

आनन्दातिशयें नयनांतुन ती ढाळी दंवबिन्दूस
अरुण येई सम्भ्रमानें
आळवी त्या दिव्यगानें

बालार्कही उधळी मयूखकिरणें स्पर्शुनि पादरजास
ज्ञानभानू उदित झाला
मार्गदर्शक हो जगाला

अज्ञानध्वान्त हरोनी सारें वितरी ज्ञान जनास
दास्यपंकीं मज्जलेलीं
जनमनें तीं मुक्त केलीं

तव आगमनानें प्रदीप्त झाले हृदयदीप हे खास
जीवनाविण वाढलेली
आस हृदिंची दग्ध झाली

ती पुन्हा पालवे तुझ्या दर्शनें, घे नूतन रूपास
मन्मनींची ध्येयलतिका
तुजविणें पुनरपि फुले कां ?
त्या जीवन पुरवी, आण फुलोरा, प्रार्थित तव चरणास

औन्ध, ९।४।३३

४७

# 'कलावती'

[ सुनीत–वृत्त शार्दूलविक्रीडित ]

बाला पुष्पयुता सुविद्य विमला माङ्गल्यमूर्ती गमे
होता रङ्ग सुसिद्ध ती प्रगटली नेपथ्यभागांतुनी
फोडी विश्वकटाह स्वर्गसरिता ये भूवरी धावुनी
वाटे कीं मधुर स्मितें उधळि दिक्प्रान्तीं यशश्री सुमें
जोडोनी करयुग्म, शीर्ष लववी अत्यादरें खालती
वन्दी भावयुता महेश्वरपदां ओलावती लोचन
शुद्ध स्निग्ध विशाल नेत्र फिरवी, दृक्क्षेप तो पाहुन
झाली मुग्ध सभा, तटस्थ जन, ते चित्रापरी लक्षिती
कंठांतून मधुस्वनौघ निघुनी ती आळवी रागिणी
घे आलाप, लकेर गोड जणुं ही मोत्यापरी भासते
जों जों राग नि रागिणी अळवितां चातुर्य ही दाविते
तों तों हृत्कुसुमें प्रफुल्लित अती होती सभाप्राङ्गणीं

† † †

श्रोत्यांचीं हृदयें समुल्लसितशीं तद्गायनीं जाहलीं
भग्ना अन्तरिं अन् तिची सुकतसे एकेक हृत्पाकळी

औन्ध, २५।६।३२

## 'प्रवासी-गुलाम'

[जाति-मुद्रिका]

कांचना विलोभुनि दास्यपाशिं गुंतलों
उत्साह नवा मज वाटे, घालीत शीळ चाललों १
पाठीवर ओझें बहुत परी ना क्षिती
सोबती सभोंतीं सारे गुण माझे बहु वर्णिती २
आक्रमीन पथ गांठीन ध्येय वाटलें
उत्साहभरें पहिल्यानें ओझेंहि सुवह जाहलें ३
राजमार्ग सुन्दर, तरुराजी विलसती
दोंबाजुस, छाया देती पथिका हो सौख्यद अती ४
चालतां चालतां मार्ग बिकट जाहला
सम्पले वृक्ष, झुडपांनीं भूप्रदेशही व्यापिला ५
सोडितां मार्ग पदिं कण्टक सलती कसें
भळभळा रक्त वाहुनी भोंवळ ही मज येतसे ६
डोईवर तापे तीव्रपणें भानु हा
पायाचे पळके माझ्या निघतात निदाघीं पहा ७
फेकितां नजर भोंवतीं मान वेळुनी
अपरांत हांसती माझे सहकारी मज निन्दुनी ८
साहचार्थ याचना करावया या जनां
मज मानधना ना साहे पडतसे पीळ मन्मना ९
व्याकूळ जाहला जीव हृदय हें उलें
आटलें नयनींचें पाणी रक्ताश्रु हाय दाटले १०
हा भार न होई सहन, उरीं फुटतसे
कोरडे ओढुनी माझी सोलती पाठ हे कसे ११
हा प्रवास मजला नको, नको जीवही
परि भावी सौख्याशेनें मी गुलाम तुडवी मही १२

औंध, २०।४।३३ प्रकाशन-कलादर्श, १५ जून ३३

## 'नादान'

[ जाति–प्रणयप्रभा ]

दु:शब्दें ताडन जन करिती
नादान आज ठरलों जगतीं ॥ध्रु०॥

दिव्य महात्मा हा अवतरला
दास्यतिमिर न्याया विलयाला
जगदुद्धारा सज्ज जहाला
ना दास्यपाश मज सोडविती
नादान आज ठरलों जगतीं १

कारागारीं देह झिजविला
राष्ट्रकारणीं प्राण अर्पिला
दिपवी आत्मबलें जगताला
मी नेत्र मिटुनि घे त्या पुढती
नादान आज ठरलों जगतीं २

मोहपाश बाजूस सारुनी
सौख्याचीही आस सोडुनी
किती महात्मे झटति निशिदिनीं
मज कांचन कान्ता लोभविती
नादान आज ठरलों जगतीं ३

प्राणांतिकही जाच सोसुनी
देशास्तव निज देह सांडुनी
अमर जाहले यश मिळवूनी

मी स्वार्थी बनलों हाय ! किती ?
नादान आज ठरलों जगतीं ४

स्वतन्त्रता पैशास्तव विकिली
मिथ्या माना मम मति भुलली
आत्मवंचना करुनि घेतली
अन्तरांत बोचे शल्य अती
नादान आज ठरलों जगतीं ५

औन्ध, १।४।३३ प्रकाशन—स्फूर्ति, जून ३३

## 'कृत्रिम-गुलाब'

[ जाति-मनमोहन ]

ही कुशल कलाकृति पाहुनि हृदयीं उठती मधुर तरङ्ग
विमल सुमना पाहुनीया
मोह वाटे मन्मना या
एकेक पाकळी मृदुल मनोरम उधळि नवोनव रंग
मुग्धबालेच्या कपोलीं
खेळते कौमार्यलाली
कीं स्पर्धा करुनी हारवितो तिज ऐसा मधुर सुरङ्ग
वायुवीची मन्द येती
पुष्प जें आन्दोलवीती
तें लाजत मुरडत रोखुनि बघतें करितें हृदय दुभङ्ग
सान कलिका हळुंच डोले
विश्व वाटे मोहवीलें
ही जादुगिरी पाहुनी मानसीं उठती भावतरङ्ग
हरितपर्णा आडुनी ही
डोकडोकावून पाही
छे ! कलिका कसली येउनि बसला वाटे येथ अभङ्ग
नेत्र भुलले भान हरलें
सूर हृदिंचे छेडियेले
ही कलावतीची कलाचातुरी करिते मन्मन गुङ्ग

औन्ध, १३।१२।३२

## 'पहिली–भेट'

[ जाति-चन्द्रकान्त ]

हंसरी राधा लाजत लाजत गालीच्या गालीं
नटुनि थटुनिया वनमालीला भेटाया आली

लज्जावनता रानकिशोरी लवली वहरानें
अस्फुट नाजुक बोल बोलण्या उत्सुक मोदानें

भाव हृदयिचा उकलायाला लागे रसवन्ती
हृद्वीणा ती मूक जाहली वनमाली पुढतीं

ठाउक नव्हती प्रणयाची नव मुशाफरी तिजला
साधी भोळी राधाबाला लाजे वदण्याला

वनमाली ते बोल ऐकण्या शिलेवरी बसला
दृष्टि दृष्टिचा खेळ चालला वाव न भाषेला

गहिरी दृष्टी हृदय विदारी विद्ध तिला करिते
राधा प्यारी नजर दृष्टिला भिडवूं ना शकते

हृदय तुडुंबुन आलें कळविल भाव कसे प्रभुला
मोदातिशयें जिव बावरला प्रार्थितसे सकलां

" दशदिग्वधुंनो ! या हो माझ्या साह्या धावून
काय बोलुं मी शिकवा मजला प्रेमाची खूण

फुलाफुलांतुन मुसमुसलेल्या प्रेमदेवतांनो !
फुंका कानीं प्रेममन्त्र तो पुष्पापुष्पांनो !

अनुरागानें थबथबलेल्या कळचा कळचांतून
सूर वाहतो वाहूं द्या तो मम हृदयांतून

सांग कोकिले ! सांग हृदयिचे भाव कसे उकलूं  
गडे सारिके ! कशी प्रभूची भावकळी उमलूं !  
जलदेवींनो ! वनदेवींनो ! सांगा प्रणयाच्या  
कशी वदूं मी रायाजवळी गोष्टी नवलाच्या  
आकाशांतिल मुग्ध मुलींनो ही जादू शिकवा  
हृत्कासारीं प्रेमसरोजा फुलवा ग खुलवा "  
मूक रवानें अस्फुट बोले शब्दहि गवसेना  
मुरलीधर सावळा सखा तर कांहीं बोलेना  
प्रेमाश्रूंनीं नेत्र डंवरले हृदय भरुनि आलें  
लाजलाजली हृदयींचे ते बंधहि थरथरले  
भाव मनींचा कळवायाचा धीर मनीं धरुनी  
रानफुलांची माला वाहीं वनमालीचरणीं  
भाव नवोत्कट उमलतांच हरि हृदयिं उचंबळला  
आत्मानंदीं तिला मिळविली सारुनि द्वैताला

औन्ध, १।६।२८ प्रकाशन-सरोज, २९

## 'सद्यःस्थिति'

[वृत्त-झिंझिण दिंडकी]

दास्यांत पिचे माय पुरी कोणि न वाली
स्वातंत्र्य न भालीं !

दुःखांत बिचारी कढते सम्प्रति माता
कोणी नच त्राता

दुष्काळ पडोनी बनला भारत सारा
वैराण सहारा

शोषी परसत्ता पिळुनी हिन्द दरिद्री
आसेतु हिमाद्री

द्रव्यास्तव दीनावरती जाच करीती
स्वार्थान्ध छळीती

ओशाळपणें वांकवितां शीर्ष कशाला ?
लज्जा न मनाला !

स्वातन्त्र्य लया जाउनि कां दास्य वरावें ?
हें योग्य गमावें !

वाचाळ वृथा होउनि लेखाळ बनावें
वादांत मरावें

वाग्वीर परी धीर न त्या संगरकामीं
होतात निकामी

देशांत पुढाऱ्यांस कुणी आज पुसेना
जो तोच शहाणा

५५

हे कोण म्हणे दे. भ. नि ते मौलवि भाई
मारीं बढाई

ना ऐक्य मुळीं येथ न विश्वास कुणाचा
कोणावर साचा

काळीज उलें पोळुनि सद्य:स्थिति सारी
पाहून विखारी

औन्ध, ३०।९।२९ प्रकाशन-स्फूर्ति, डिसेंबर २९

# 'मागणें'

[ जाति–गोविन्द ]

विनति तुझ्या चरणास, शारदे !
विनति तुझ्या चरणास ॥ ध्रु० ॥

रानफुलांची माळ गुम्फिली अर्पित चरणरजास
रानफुलें हीं निर्गुण साधीं यासि न तिळभर वास
सद्भावें परि अर्पण करितों गोड करुनि घें यास
तव पूजा बान्धावी प्रेमें वाञ्छा फार जिवास
तुझ्या मन्दिरा भंवति पहारा मार्ग न मज येंण्यास
द्वारपाल तव येउं न देती ताडिति मज दीनास
मत्स्पर्शानें सदन कलंकित होइल भीति जनास
निर्दय होउनि वाक्शर फेकिति, पडति घरे हृदयास
तव मूर्तीचें दर्शन घ्यावें भाग्य न या जीवास
भक्तियुक्त हृदयाचें पूजन घेशिल कां ? मनिं ध्यास
अर्पित माला पाइक दुरुनी स्वीकारी पूजेस
कृपाकटाक्षा फेक मजवरी तिमिर नेइ विलयास

औन्ध, १८।४।१३



# ‘प्रेममय-जग’

[ जाति–बालानन्द ]

जग अवघे प्रेमें भरलें    प्रेमबिन्दु बघ पाझरले
अशोक फुलला प्रेमानें    चंपक डोले मोदानें
आनन्दें तारकागण    स्वच्छन्दें करितो गान
गान गायनीं
जाइ रंगुनी
मोद भरूनी
दुःखशून्य मन जैं बनलें    प्रेमपूर्ण जग हें झालें    १
श्रान्त मना शमवायाला    क्लान्त जिवा रिझवायाला
निशिथप्रशान्तसमयाला    सौधावरि ये नव बाला
नभीं तारका
इथें बालिका
मधें चन्द्रिका
श्रमल्या जीवा रिझवीले    प्रेमपूर्ण जग हें झालें    २
नभीं देखुनी इन्दूतें    सागरास येई भरतें
उत्सुक विधुभेटी प्राण    सागर घाली थैमान
किरण फेकले
दर्या उसळे
तुफान सुटलें
वीचीचें गाणें चालें    प्रेमपूर्ण जग हें झालें    ३

पुणें, १०।३।२८    प्रकाशन–सरोज, २९

## 'वञ्चिता'

[जाति--अभिसारिका]

भाळले रूप तुझें पाहुनी
भुलविलें वैभव मज दावुनी
परि हाय वंचिलें मोहजाल पसरुनी १

सोडुनी लाज तुला वरियलें
राजसा ! सर्व तुजसि अर्पिलें
निःसंग होउनी तव पायीं रंगलें २

नयनिं तव तेजशलाका वसे
जादुगिरी चंचलता ही दिसे
मज हृदय विदारुनि केलें वेडेपिसें ३

बोलणें गोड हृदय वेधितें
मुखावर हास्य मधुर खेळतें
ओठांत सुधा परि वीष हृदयिं विलसतें ४

तुझा तो झोक नोक पाहुनी
चाल तशि ऐटदार देखुनी
मन गेलें नकळत तुजवरती लोभुनी ५

एकटी अबला गृहिं पाहुनी
कशाला गेला मज निरखुनी
घायाळहि केलें कटाक्षशर रोखुनी ६

कडोसा पडलेला पाहुनी
गाठलें एकान्तीं येउनी
चाहूल लागतां गेलें वेडावुनी ७

जाहलें अर्धमेली शरमुनी
पाहिलें खालीं ओशाळुनी
घडधडे ऊर कंचुकी चिब हो झणी ८

क्षणार्माधि वश करुनीं घेतलें
मधुर वच ऐकुनि धुंदावलें
तुजवरुनी यौवन ओवाळुनि टाकिलें ९

मूर्त तव भरली हृदयन्तरीं
जाहलें दंग सौख्यसागरीं
दृष्टीस रोखतां नजर होय बावरी १०

रतीसम सुन्दरता लाभली
ठरेना नजर कृष्ण कुन्तलीं
नव तारुण्याची कान्ति अंगि दाटली ११

पाश संसृतिचे मीं तोडिले
सर्वही आप्तगोत विसरलें
विश्वास ठेवुनी पाठिं तुझ्या लागलें १२

तीव्र किति जननिन्दा साहुनी
सेविलें तुजसी मी निशिदिनीं
परि तोण्डघशी पाडिलें मजसि त्यागुनी १३

जाहली शुष्क लता ैवनीं
जातसे क्षीण छबी होउनी
निष्प्राणकलेवर काय करूं ठेवुनी १४

औन्ध, १।३।३१

## 'एक-दृश्य'

[ जाति-चन्द्रकान्त ]

उषादेवता पहा पातली खुलली प्रणयानें
प्रणयरंग नव काय उधळिला त्या रविरायानें
जाउं लागला अस्तमानिं हा रजनीचा राजा
कटाक्ष फेंकित पुढें चालला पसरितसे तेजा
सुवर्णकिरणें गिरीकन्दरीं शिरलीं लवलाही
पर्वत डोंगर नद्या सर्वही सुवर्णमय होई
मन्दवायुची झुळुक तरलसी घाली गुंगारा
गिरकीचा ती खेळ खेळते दरींतुनी सारा
मेघ पसरले पूर्वेला ये छटा गुलाबाची
जणूं जाहली पूर्ववधू ही रोषयुक्त साची
भिन्न भिन्न रंगीं रविरायें धरा चित्रियेली
नीलाकाशीं उधळपट्टिही कोणी चालविली ?
भूदेवीचे भाट द्विजगण रविराया स्तविती
गोड गळ्यानें जगदीशाला ललना आळविती
रजनीचें साम्राज्य लोपुनी भानूदयकालीं
सृष्टिसतीच्या मुखचन्द्रावर जीवकळा आली

औन्ध, मे २८ प्रकाशन-सरोज, २९

# 'शापभ्रष्ट देवता'

[ जाति–बालानन्द व स्वर्गङ्गा मिश्र ]

आकाशींची वीजच कीं   अवतरली या भूलोकीं
अलकभार मृदु मन्द वायुच्या
झुळुकीसरसी उडे पहा
जणुं षट्पद हा १

लगबग जाई पथांतुनी   चपला जैसी ढगांतुनी
वामकरें सांवरितां अंचल
अभिनय नयना लावि पिसें
मन मोहितसे २

अल्लड नाजुक कलिका ती   अर्धस्फुट फुलली होती
अर्धोन्मीलित मधुकलिकेची
सुन्दरता ना कुठे दिसे
किति गोड हसे ३

नयनीं विलसे चंचलता   अगाधहृदयीं अस्थिरता
भावोन्मेषें कपोल खुलतां
लज्जायुत मुख होय कसें
रमणीय दिसे ४

नव युवती राजसबाळी   नवी नव्हाळी तिज आली
मन्दस्मित वदनांत खेळतां
कपोलास खळगी पडती
ती रम्य अती ५

यौवनभारें लवलेली   तारुण्यानें मुसमुसली
सात्त्विकतेचे भाव मुखावर
पाहुनि हृदयीं ये भरती
हो धन्य किती ६

शापभ्रष्टा ही देवी   विमल भाव हृदयीं उठवी
शुक्रान्त्री चान्दणी जणूं कीं
स्वर्गींची अंगना असे
ही अनुपमसे ७

औन्ध, १९।११।२८   प्रकाशन-सरोज, २९

## साहित्य-सरोज-मण्डळ, औंध.

| | | |
|---|---|---|
| १ सरोज ( पद्य-मण्डळ ) | | ०-४-० |
| २ शेती आणि शेतकरी | (पोवाडा-मा० कृ० दाभाडे) | ०-४-० |
| ३ मालती ( पद्य-शशाङ्क ) | | ०-१०-० |
| ४ शशिकला (नाटिका-शशाङ्क.) | | छापत आहे. |

## 'शशाङ्क' यांचीं पुढील प्रकाशनें.

१ भारतीय चित्रकला ( प्रबंध )
२ शशिप्रभा ( स्फुट-निबन्ध )
३ भारतीय नृत्यकला ( प्रबंध. )

बालकृष्ण मार्तण्ड दाभाडे,
मु०पो० औंध,(जि०सातारा.)